ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



# तिफण

वर्ष : ११ वे अंक : २ रा व ३ रा
जुलै ते डिसेंबर – २०२०

## लोककला विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष अकरावे, अंक- २रा व ३रा, जुलै-डिसेंबर २०२० (जोडअंक)

UGC Care Listed Journal

ISSN 2231 - 573X

- संपादक -

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,

हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३,

मोबा. ९४०४०००३९८

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक / लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|
| * | लोककला विशेषांकाच्या निमित्ताने... - डॉ. शिवाजी हुसे | |
| * | संपादकीय - प्रा. डॉ. चंद्रशेखर कणसे (अतिथी संपादक) | |
| १. | 'कीर्तन' समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम: एक अभ्यास - डॉ. चंद्रशेखर कणसे (परळी वैजनाथ, बीड) | ९ |
| २. | महाराष्ट्रातील लोककला : कीर्तन - प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस (दापोडी, पुणे) | १८ |
| ३. | वारकरी दिंडी लोककला : एक आनंदयात्रा - धन्यकुमार प्रल्हाद तारळकर (ता. फलटण जि. सातारा) | २४ |
| ४. | 'सोंगी भारूडी भजन' - डॉ. आनंद बल्लाळ (आजरा, कोल्हापूर) | ३२ |
| ५. | प्रयोगात्मक लोककलाप्रकार - 'भारूड' - डॉ. नाना झगडे (पुरंदर) | ३९ |
| ६. | विदर्भातील झाडीपट्टी येथील लोककला 'दंडार' - प्रा. अमृता डोरलीकर (नागपूर) | ४७ |
| ७. | महाराष्ट्रातील लोककला 'बोहडा' - डॉ. भास्कर शेळके (अकोले) | ५२ |
| ८. | गोमंतकीय लोककला : विशेष संदर्भ 'धालोत्सव' - डॉ. नीता तोरणे (पेडणे, गोवा) | ५५ |
| ९. | 'गोंधळ : स्वरूप आणि आविष्कार' - डॉ. पांडुरंग भोसले (हडपसर, पुणे) | ६७ |
| १०. | महाराष्ट्रातील लोककला : 'गोंधळ' - डॉ. पद्माकर तामगाडगे (मुंबई) व प्रा. राजू शनवार (ठाणे) | ७१ |
| ११. | महाराष्ट्राचे विधिनाट्य 'गोंधळ' आणि 'जांभूळ आख्यान' - प्रा. शिल्पा नेवे (मुंबई) | ७५ |
| १२. | 'गोंधळ' कला प्रकाराचे बदलते स्वरूप - डॉ. जयदेवी पवार (बाभळगाव, ता. जि. लातूर) | ८९ |
| १३. | गोंधळ : महाराष्ट्राची लोककला - डॉ. वैशाली श्रीकृष्ण भालसिंग (अहमदनगर) | ९५ |

१४. 'जागरण' - डॉ. राखी सलगर (औरंगाबाद) १०२
१५. गोवा येथील लोककला 'जागर' - प्रा. विनय मडगांवकर (गोवा) १०६
१६. महाराष्ट्रातील लोककला : 'दशावतार व नमन' - प्रा. प्रियंका कुंभार (तासगाव, जि. सांगली) ११४
१७. महाराष्ट्रातील लोकनाट्याचा आविष्कार - 'ल‌ळीत' - प्रा. पुरुषोत्तम महाजन (भुसावळ) १२१
१८. 'लळीत' - डॉ. प्रतिभा सोनी (शिक्रापूर, शिरूर) १२८
१९. सर्वांना एकत्र बांधून ठेवणारा सांस्कृतिक ठेवा - 'भोंडला' - प्रा. तारळेकर (सांगली) १३३
२०. 'लोककला तमाशा'- एक अभ्यास - प्रा. डॉ. रामहारी मायकर (वडवणी जि. बीड) १३८
२१. 'लोकरंगभूमीवरील डाका विधीनाट्य' - डॉ. सुनिल टाक (औरंगाबाद) १४३
२२. 'लोकसाहित्यातील लोककला प्रकार' - डॉ. भाऊसाहेब गव्हाणे (केडगाव, ता. दौंड, जि. पुणे) १४८
२३. लोककला : स्वरूप व वाटचाल - प्रा. डॉ. विजय विष्णूपंत केसकर (कळंब, जि. उस्मानाबाद) १५५
२४. 'महाराष्ट्रातील लोककला : एक चिंतन' - कु. वर्षा तांदळे (कोल्हापूर) व प्रा. बाळासाहेब चव्हाण (कोरेगाव) १६०
२५. आदिवाशी यांच्या लोककला - प्रा. चिंतामण धिंदळे (नगर) १६५
२६. महाराष्ट्रामधील आदिवाशी लोककलांचे विवेचन - डॉ. सुनिल घनकुटे (अकोले जि. नगर) १७१
२७. महाराष्ट्र लोकसंस्कृती उपासकांचे कलाविष्कार : वासुदेव आणि पोतराज - डॉ. किरण नामदेव पिंगळे (नाशिक) १७८
२८. लोकसंस्कृतीचे लोककलेतून सहज सुंदर आविष्कार घडविणारा 'वासुदेव' - डॉ. नानासाहेब पवार (हडपसर, पुणे) १८४
२९. पोतराजाची आराधना : एक लोककला - डॉ. नितीन मोटे (वडगाव, पुणे) १९४
३०. महाराष्ट्राच्या लोककलेचा सहजसुंदर आविष्कार - लावणी - डॉ. धबडगे (औरंगाबाद) २००

# महाराष्ट्रातील आदिवासींच्या लोककला

- प्रा. चिंतामण धिंदळे
(मराठी विभागप्रमुख)
राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

**प्रस्तावना :-**

भारतीय आदिवासी हा स्वातंत्र्योतर काळात अनेकांच्या आकर्षणाचा विषय झाला होता. उदा. भारतात येणारे हौसी पर्यटक आदिवासी क्षेत्राला आवर्जून भेट देत. आदिवासी लोककलांच्या महोत्सवी कार्यक्रमात हौशी पर्यटकांची उपस्थिती लक्षणीय प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात जवळजवळ ४७ आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीचा अभ्यास करता, त्यांची संस्कृती, वेगळी असल्याचे जाणवते. त्यांची बोलीभाषा, सण-उत्सव, लग्न समारंभ पद्धतीमध्ये साम्यआढळत असले तरी, ते वेगळे आहेत. आदिवासींच्या जीवनातील समान गुणधर्म जर काय असेल तर तो प्रत्येक आदिवासी जमाती या निसर्गपूजक आहेत. निसर्गालाच त्या देव मानतात. निसर्गाच्या सानिध्यात ते आपले जीवन जगत असतात. आयुष्यभर काबाडकष्टाचे जीवन वाट्याला आलेला आदिवासी माणूस लोककलांच्या माध्यमातून आपल्या जीवनात विरंगुळा शोधत असतो. जवळपास प्रत्येक जमातीची एक स्वतंत्र लोककलाआज अस्तित्वात आहे. कलेच्या माध्यमातून ते आपल्या समाजाची संस्कृती दुसऱ्या समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. नृत्य, गाणे, वाद्य, अशा प्रमुख कलांबरोबरच तमाशा, वगनाट्य, भारूड, दशावतार, बोहाडा, जत्रा अशा माध्यमातून ते आपल्या उपजत कलागुणांना वाव देताना दिसतात. काळाच्या ओघात बहुतांशी जमातींच्या कला कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहेत. शासन दरबारी ह्या कला संवर्धनकरण्याचेजोरदार प्रयत्न चालू आहेत. मात्र औपचारिकपणामुळे त्यात यश येताना दिसत नाही. साक्षरता वाढली पण आपली उपजत कला मात्र हा समाज विसरत चालला आहे. तरूण पिढीला ह्या कलांविषयी फारशी आस्ता नाही. एकूणच काय तर या कला जतन करायला हव्यात. या कलांचे संवर्धन व्हायला हवे. सरकारी दरबारी असणारी उदासीनता दूर व्हायला हवी. आदिम संस्कृती नष्ट होऊ पाहात आहे. लोककलांच्या माध्यमातून आदिवासी संस्कृती टिकविणे आज काळाची गरज आहे. आदिवासींच्या लोककला म्हणजे पांढरपेशीय समाजाच्या मनोरंजनाचा उपक्रम नव्हे तर त्यांच्या कला त्यांच्या जगण्याचा मूलाधार व्हावा ही संकल्पना त्यांच्या ठायी रुजवणे काळाची गरज आहे.

**आदिवासी संकल्पना :-**

आदिवासीबाबत विविध अभ्यासकानी, संशोधकांनी विविध व्याख्या मांडल्याचे दिसते. त्या व्याख्यांच्या अनुषंगाने आपल्याला आदिवासी म्हणजे काय, व त्याविषयीची संकल्पना स्पष्ट करता येईल. डॉ. घुर्ये यांनी आदिवासींना 'मागासलेले हिंदू' असे संबोधले आहे. काही अभ्यासक आदिवासी हे मुळचे रहिवासी आहेत असे मानतात. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने कोणत्याही देशातील मूळ रहिवाश्यांना संबोधण्यासाठी आदिवासी ही संज्ञा वापरावी असे म्हटले आहे. अजून काही अभ्यासकांनी विविध व्यापाराच्या द्वारे आदिवासी संकल्पना स्पष्ट केल्या आहेत.

१. **बोआम :-** यांच्या मते जगात म्हणजे आर्थिकदृष्ट्या असा स्वातंत्र लोकसमूह की जो एक भाषा बोलतो व बाह्य आक्रमणापासून स्वताःचे संरक्षण करण्यासाठी संघटीत झालेला असतो.
२. **गिलीन व गिलीन :-** यांचे मते एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोली भाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात.
३. **डॉ. मुजुमदार :-** यांच्या मते आदिवासी समुदाय म्हणजे नातेदारीने संबधित असणाऱ्या अनेक कुटूबांचा असा समुच्च्य होय की ज्याचे एक सामान्य नाव व समान भाषा असते. हा समुदाय एका विशिष्ट भूप्रदेशावर वसलेला असतो. तसेच या समुदायाला सभासद विवाह व व्यवसायाबद्दल समान नियमांचे पालन करतात.
४. १९६२ साली शिलाँगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासी समुदायाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. 'आदिवासी समुदाय हा एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा असा एक सजातीय गट आहे की, ज्यातील सभासद एक भाषा किंवा बोली बोलतात. त्यांचे एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य असते. हे लोक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागासलेले असतात. अक्षर ओळख नसलेल्या व रक्तसंबधावरआधारित सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिक पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समुदाय असे म्हणतात.'

आदिवासी जमात, आदिवासी समाज, आदिवासी समुदाय अशा संज्ञांच्याव्याख्या विचारवंतानी केल्या आहेत. या सर्व व्याख्यामधून आदिवासी जमात या शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. एकूणच आदिवासी समाज ह्या भूमीवरचा प्रथम समाज आहे, असा निकष लावता येऊ शकेल. कोणत्याही देशाचा मूळ रहिवाशी आदिवासी समाज असा अर्थ लावता येऊ शकेल.



6 / 10

**महाराष्ट्रातील आदिवासी जमाती:-**

महाराष्ट्रात आजमितीस जवळ-जवळ ४५ आदिवासी जमाती आहेत. सह्याद्री, सातपुडा, ब्रह्मगिरी, भीमाशंकर, महादेवाच्या टेकड्या या डोंगररांगाच्या पायथ्याशी आदिवासी जमातींची वस्ती आढळून येते. औधोगिकरणाचापरिणाम त्यांच्या जीवनरहाटीवर पडलेला दिसून येतो. डोंगरदऱ्यातून वस्ती करून राहणाऱ्या या जमाती आता सपाट प्रदेशात, शहराच्या जवळ यायला लागल्या आहेत. शिक्षणाचा झालेला प्रसार आणि प्रचार यामुळे आदिवासी समाज शिकून नोकरी व्यवसायानिमित्त, रोजगाराच्या शोधात शहरात राह्यला येऊ लागला आहे. आदिवासी जमतींची नावे भिन्न अशी आहेत. उदा. गोंड, भिल्ल, कोलम, कोरकू, माडिया, अंध, इत्यादी. आदिवासींच्या वसतीस्थानाचा विचार करता उदा. कोळी महादेव, ठाकर ह्या जमाती पुणे, अहमदनगर, ठाणे, रायगड, नाशिक या जिल्यात आढळतात. कोरकू, वापेची, भावासी, वापी व निहाल ह्या जमाती अमरावती जिल्यातील मेळघाट भागातच आढळून येतात. थोडक्यात आदिवासी जमातींची विशिष्ट भाषा, प्रदेश, चालीरीती-रिवाज, संस्कृती असे वेगळेपण आपणास जाणवते. आदिवासी जमातींचा मुख्य व्यवसाय शेती करणे व त्याबरोबरच पशुपालन हा पूरक व्यवसाय करणाऱ्या काही आदिवासी जमाती आहेत. तर अजूनही बहुतांशी जमाती या जंगल व त्यातून मिळणारे वनउपज, मजुरी, यावर अवलंबून आहेत. पूर्वी शेती व्यवसायाकडे वळण्याअगोदर जंगलात जाऊन शिकार करणे, जंगलातील सरपण, फळे, हिरडा, बेहडा, गोळा करून आपला उदरनिर्वाह करीत असत. शिक्षणाने समाज बदला व सुधारित तशीच पारंपारिक शेती करणे, गुरे पाळणे, शहरात जाऊन रोजगार मिळविणे, नोकरी, व्यवसाय करणे, हा बदल झाल्याचे दिसते.

आर्थिकदृष्ट्या मागास असलेला हा समाज मात्र सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न आहे. निसर्गाला देव मानणारा, निसर्गाच्या नियमांप्रमाणे जीवन जगणारा हा समाज आपल्या कला-गुणांसाठी प्रसिद्ध आहे. जवळ-जवळ सर्वच आदिवासी जमातीमध्ये काहीना काही कला ह्या उपजतच असतात. त्यांच्या विवाहप्रसंगी, शेतीच्या कामाच्या वेळी, कामे संपल्यावर रिकाम्यावेळी मनाला विरंगुळा मिळावा, श्रम कमी व्हावेतम्हणून नाच-गाण्यांचा कार्यक्रम हमखास होत असतो. लग्नविधी, जत्रा विशेषतः सामुदायिक कार्यक्रमात स्त्रियांची नृत्ये होतात, प्रत्येक आदिवासी जमातीत अशाप्रकारची नृत्ये होत असतात. मात्र स्त्रियांच्या नृत्याला विशेष महत्त्व असते. आदिवासींचा भूप्रदेश हा शहरापासून दूर असल्याने नागर संस्कृतीचे विशेष अजूनही त्यांच्यापर्यंत पोहचले नाहीत, थोड्याफार प्रमाणात शहरातील संस्कृती आज आदिवासी समाजाची झाल्याचे दिसते. परंतु सगळ्या आदिवासी जमाती आपल्या पारंपारिक लोककला जतन करून आहेत. देशातील इतर राज्यांचा विचार करता

ज्या ठिकाणी आदिवासी समूह आहे, त्यांची आजची स्थिती पाहता महाराष्ट्र, पूर्वांचल, दक्षिण भारत या राज्यातील आदिवासी जमाती मुख्य प्रवाहामध्ये आल्या आहेत. मात्र मध्यप्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हिमाचलप्रदेश, ओरिसा, प. बंगाल, तेलंगाना, बिहार, झारखंड या राज्यातील आदिवासींची स्थिती वाईट आहे. राज्यस्थान मधील मीना नावाच्या जमातीचा जितका विकास झालेला दिसतो तितका विकास इतर जमातींचा झालेला नाही.

**आदिवासींच्या लोककला: -**

आदिवासी समाज म्हटला की कला ही आलीच. कारण आदिवासींचे जगणे कलेशिवाय अधुरे आहे. लोककलेमधून आदिवासींची जीवनरहाटी, संस्कृती व एकूणच जगण्याचा आशय त्यातून व्यक्त होत असतो. उदा. नृत्य, वाद्य, गायन, चित्रकला, विनकाम इ. कला आढळून येतात. त्यातही'नृत्य' ही लोककला सर्वच आदिवासी जमतीमध्ये आढळून येते. उदा. ठाकर जमातीचा कांबडनाच, ठाकर स्त्रियांची 'फुगडी'ह्या कला इतर जमातीत दिसून येत नाहीत. फुगडी हा नाच सर्वच जमातीत असला तरी ठाकर स्त्रिया फुगडी बसून घालतात, बाकी जमातीच्या स्त्रिया फुगडी उभ्याने खेळतात. कोळी महादेव जमातीत 'घेवडा' व 'वरमाई' हे दोन नाच प्रमुख आहेत. वाध्यांचा विचार करता पावा, बासरी, ढोल, ढोलकी, झांज, इत्यादी वाद्यंचा समावेश होतो. सर्वच आदिवासी जमातींना गायनाची कला अवगत असते. किंबहुना ती कला त्यांना निसर्गतःच मिळालेली देणगी आहे. चित्रकलेचा विचार करता वारली चित्रकला जगप्रसिद्ध म्हणून मान्यता पावली आहे. विणकाम ही कला सर्वच आदिवासी जमातींना अवगत असते. जंगलात मिळणाऱ्या बांबूपासून गृह उपयोगी वस्तू ते बनवित असतात. उदा. टोपल्या, कुरकुले, हारा, किरकिंडा, कणगा, कणगी, काठवळा, मळई, बोक्सी, सुपाट, इरले, चटया जवळजवळ सर्व उपयोगी वस्तू ते घरच्या घरी बनवितात. मासेमारीसाठी बऱ्याच वस्तू बनवितात. ससे मारण्यासाठी वाघुर बनवितात. एकूणच आदिवासी जमातीमध्ये कलेचा वारसा दिसून येतो. आदिवासींच्या कला ह्या केवळ कला नसून त्या उपयोजित कला म्हणून त्यांचा विचार व्हायला हवा.

**१. आदिवासी नृत्य :-** महाराष्ट्रामध्ये एकूण ४७ आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीचा एक वेगळा नृत्य प्रकार आहे. नाच संस्कृती आदिवासींची आहे. त्यांच्या नाच संस्कृतीनेच त्यांचे जीवन समृद्ध केले आहे. आनंदाच्या प्रसंगी हा समाज एकत्र येतो आणि बेधुंद रात्रभर नाचतो. नाचताना सर्व दुःख विसरून नाचतो. निसर्गाच्या साथीने, निसर्गाच्या संगतीने तो नृत्य करीत असतो. सह्याद्रीच्या पायथ्याशी व कोकणात 'ठाकर'नावाची जमात वास्तव्य करून राहते. ठाकर आदिवासींमध्ये'कांबड'नाच विशेष प्रसिद्ध आहे. दहा ते पंधरा पुरुष मंडळी एकत्र येतात, मोठे (कोंडोळे) रिंगण केले जाते,

मध्येढोल वाजवणारा एक ढोल्या असतो. त्याच्या समोर ढोलाला पकडून राहणारा एक व गाणे म्हणणारा असा हा कांबड नाच सुरु होतो. शेतीची कामे आटोपल्यावर रात्री चांदण्यात ही मंडळी एकत्र जमते व कांबड नाच सुरु होतो. वेशभूषा अशी विशेष नसते मुळातच अंगभर कपडे नसणारा हा समाज डोक्याला मुंडास, अंगात कोपरी, किंवा बंडी पायात मात्र चाळ (घुंगरू), हाताला (मनगटाला) फुलांचा गजरा बांधून आपला नाच सुरु करतात. त्यांच्या गीतात उत्साह असतो. नाचणे हा त्यांचा छंद आहे. बेफाम होऊन नाचणे, त्यांचा हा नाच रांगडा आहे, वेगात नाचले जाते. म्होरक्या मध्येच शिळ घालून इशारे करतो, कुठे मुरडायचे, वळायचे कुठे, कुठे आवाज काढून नाचायचे हे ठरलेले असते. मर्दानी अशा नाचातून ठाकरांचा चपळपणा, काटकपना जाणवतो. ज्या पद्धतीने पुरुष मंडळी कांबडा नाच सादर करतात, त्याचप्रमाणे स्त्रिया सुद्धा फुगडी नाच सादर करतात. १० ते १५ स्त्रिया रिंगण करून गोलाकार उभ्या राहतात. कधी पायाच्या चवड्यावर बसून गाणी म्हणत फुगडी नाच करतात. या नृत्यात तरून मुली, वृद्ध स्त्रिया, मध्यम वयाच्या स्त्रिया नाचत सहभागी होतात. या नाचासाठी कोणत्याही वाद्याची गरज नसते. टाळ्यांच्या तालावर गाणी म्हणत फुगडी नाच सादर केला जातो.

२. **आदिवासी कोळी महादेव जमातीचा घेवडानृत्य :-** कोळी महादेव ही जमातमहाराष्ट्रातील सहा जिल्यात वास्तव्य करून राहत आहे. पुणे, अहमदनगर, नाशिक, ठाणे, रायगड, पालघरसह्याद्रीच्या कुशीत व कोकणच्या पायथ्याशी राहणारी ही जमात शेती, पशुपालन, मजुरी करून आपला उदरनिर्वाह करतांना दिसते आहे. जागतिकीकरणात बहुतांशी शिकलेला तरुण शहरात नोकरी, रोजगारानिमित्त गेला आहे. कोळी महादेव या जमातीची एक वेगळी अशी बोली प्रचलित आहे. त्या बोलीस 'डांगाणी' व 'मावळी' बोली असे संबोधले जाते. पुणे जिल्यात 'मावळी' बोली म्हणून प्रसिद्ध आहे. तर अहमदनगर, नाशिक जिल्ह्यात 'डांगानि' बोली म्हणून प्रसिद्ध आहे. या जमातीचे दोन नृत्य प्रसिद्ध आहेत. ती दोन्ही नृत्य लग्ना प्रसंगी नाचली जातात. एक आहे 'वरमाई'नृत्य व दुसरे आहे 'घेवडा' नृत्य. हळदीच्या दिवशी आदिवासी स्त्रिया वरमाई नृत्य नाचतात. वाजंत्री वाजवितात, व या स्त्रिया हातात आहेर घेऊन नाचविण्याच्या नृत्यला वरमाई नृत्य म्हणतात. वरातीच्या रात्री नवऱ्या मुलीला व नवऱ्या मुलाला कडेवर घेऊन दोन पुरुष वाजंत्र वाजवतील त्या तालावर वधु-वराला नाचविले जाते. त्या नृत्याला 'घेवडा' नृत्य म्हणतात. नवरा. नवरीच्या हातात, कपड्याचे चाबूक तयार करून दिले जातात. त्या चाबकाने एकमेकाला मारण्याचा कार्यक्रम होत असतो. अतिशय गमतीशीर हे नृत्य असते. प्रत्येक आदिवासी जमातीचे असे स्वतंत्र बोली व नृत्य असते.

आदिवासी जमाती त्यांच्या कलांनी ओळखल्या जातात. आदिवासी संस्कृती ही

अतिशय समृद्ध आहे. त्यांच्या लोककलांमधून त्यांचे जीवन, संस्कृतीचे दर्शन होत असते. या लेखामध्ये आदिवासी ठाकर व कोळी महादेव या जमातींच्या लोककलांचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**मूलभूत संदर्भ :-**

अकोले तालुक्यातील 'चाळीसगाव डांगण' आंबेगाव तालुक्यातील 'घोडनयार' जुन्नर तालुक्यातील 'कुकडेनयार' इगतपुरी तालुक्यातील 'महालदेश' मूळनयार, पेहरा, या प्रदेशातील आदिवासी जमातीच्या लोककलांचा अभ्यास करून वरील नोंदी केल्या आहेत.

* * * * *